# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Local Crime Branch, Washim**

**Date of Good Work done** :- **18/10/2022**

**Brief of the work done :-**

# काळया बाजारात विक्री करीता गहु घेवुन जाणारा ट्रक व ६.५२ लाखाचे धान्य जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची माहिती

देशोन्नती वृत्तसंकलन...



**वाशिम** ■ पो स्टे अनसिंग हद्दीतून एका ट्रकमध्ये अवैधरित्या गहु वाहतुक होत आहे. अशा खबर वरून स्थानिक गुन्हे शाखेने ट्रक मधील २३९ क्विंटल किंमत ६ लाख ५२ हजार ४७० रूपयाचा गहु व ट्रक किंमत २५ लाख रूपये असा एकुण ३१ लाख ५२ हजार ४७० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधिक्षक बच्चन सिंह यांनी जिल्हयातील अवैध धंदे , काळया बाजारात जाणारा गहु ,तांदुळ विकी करणाऱ्या इसमांवर प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करुन वाढत्या गुन्हेगारीस आळा घालण्याबाबत आदेशित केले आहे. १६ ऑक्टोंबर रोजी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, पो स्टे अनसिंग हददीतुन एका ट्रकमध्ये अवैधरित्या गहु वाहतुक होत आहे. अशा खबर वरून स्थानिक गुन्हे शाखेतील पथक सपोनि प्रमोद इंगळे ,पोहवा किशोर चिंचोळकर,दिपक सोनावणे, पोना अमोल इंगोले ,प्रविण राउत,पोकॉ संतोष शेणकुडे यांना आदेशीत करून नमुद माहीती प्रमाणे कार्यवाही करणे कामी पोस्टे अनसिंग हद्दीत रवाना केले.

सदर बातमीप्रमाणे पोस्टाफच्या मदतीने अनसिंग पुसद रोडवर पाटील धाब्याजवळ नाका बंदी करून संशयास्पद येणारा ट्रक क्रमांक एम एच २९ टी १६०७ ला थांबवुन त्यास नाव गाव विचारले असता चालक - मालक इम्रानखान अब्दुल रहेमान खान व इतर एक रा.खतीब वार्ड पुसद जि.यवतमाळ यास गाडीमध्ये काय आहे असे विचारले असता गहू धान्य असल्याचे सांगीतले. त्यास माला बाबत कागदपत्राची मागणी केली असता काटा पावती सोडून कोणत्याही प्रकारचे कागद पत्र नसल्याने सदरचा ट्रक मधील गहु धान्य २३९ क्विंटल किंमत ६ लाख ५२ हजार ४७० रूपयाचा गहु व ट्रक किंमत २५ लाख रूपये असा एकुण ३१ लाख ५२ हजार ४७० रूपयाचा गहु धान्य काळया बाजारात जाणारा जप्त करून सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस स्टेशन आसेगांव येथे जमा करण्यात आला.

पुढील कायदेशीर कार्यवाही कामी तहसिलदार वाशिम यांना पत्र व्यवहार करण्यात आला आहे. तसेच या व्यतीरीक्त सन २०२२ मध्ये विविध पोस्टे अंतर्गत एकुण ११ केसेस मध्ये ६१लाख ९२ हजार ५३५ रूपयाचा अवैधरित्या काळयाबाजारात विकी करीता जाणारा गहु व तांदुळ जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाईत पोलीस अधिक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधिक्षक गोरख भामरे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, सपोनि सपोनि प्रमोद इंगळे ,पोहवा किशोर चिंचोळकर,दिपक सोनावणे, पोना अमोल इंगोले ,प्रविण राउत,पोकॉ संतोष शेणकुडे यांनी सहभाग नोंदविला. नमुद गुन्हयाचा पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा वाशिम हे करीत आहेत. (जि.प्र.)